करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. १२३

# महाराष्ट्र शासन

## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग


दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१

Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com


---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२७/०३/२०२०

---

**वाचले**:-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५.

२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०.

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०.

४) साथ रोग अधिनियम १८९७.

५) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२२/०३/२०२०.

६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडील अधिसूचना क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, Dated :-२५ March २०२०

७) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२४/०३/२०२०. **(करोना २०२०/ सूचना/आदेश क्र.९८ व १०७)**

८) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.२५/०३/२०२०. **(करोना २०२०/ सूचना/आदेश क्र.१११ व ११४)**

९) या कार्यालयाकडील आदेश क्र. साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२०, दि.२६/०३/२०२० **(करोना २०२०/सूचनां/आदेश क्र.११६)**

---

**आदेश,**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

उपोद्घात क्र.५ अन्वये, करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून औद्योगिक, खाजगी आस्थापनांमधील होणारी गर्दी टाळणे आवश्यक असल्याने रायगड जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापना, आय.टी. व सॉफ्टवेअर कंपन्या, तसेच त्यांना सेवा पुरविणाऱ्या आस्थापना दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत पुर्णपणे बंद करण्यात आलेल्या आहेत.

सदर आदेशामधून जीवनावश्यक वस्तु, औषधे (Medicine) तयार करणाऱ्या आस्थापना, औषधे निर्माण करण्यासाठी लागणारा कच्चा माल (Raw materials) निर्माण करणाऱ्या व त्यांची उपउत्पादने (By products) निर्माण करणाऱ्या, औषधाची पॅकेजिंग करणाऱ्या आस्थापना, सदर पॅकेजिंगसाठी लागणाऱ्या वस्तूंची उत्पादने निर्माण करणाऱ्या आस्थापना, पुरवठा साखळीतील सेवा, वैद्यकीय संसाधने निर्माण करणाऱ्या व त्यांच्या

पॅकेजिंगसाठीची उत्पादने निर्माण करणाऱ्या आस्थापना, औषधे पुरवठा करणारे वितरक (Distributors), औषधांची वाहतूक करणारी वाहने (Transportation) ची आस्थापना या कंपन्याच्या मालवाहतूक सेवा व कर्मचारी वर्गाच्या बसेस व इतर वाहने सुरु राहतील. तसेच ज्या कंपनीची उत्पादन प्रक्रीया अखंडीत चालू राहणे (Continuous Processing Industry) अनिवार्य आहे, अशी आस्थापना कमीत कमी कर्मचारी वर्ग (कमाल ५०%) यांचेसह चालू ठेवावी या कंपन्यांच्या माल वाहतूक सेवा व कर्मचारी वर्गाच्या बसेसना सुट देण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भ आदेश क्र.७, ८ व ९ अन्वये यापुर्वी ३०७ कंपन्यांना या कार्यालयामार्फत सुट देऊन त्यांचे कामगार /अधिकारी यांना ने-आण करण्याकामी तसेच कच्चा माल व पक्का मालाची वाहतूक करण्याकामी सूट देण्यात आली होती. त्यानंतर प्राप्त विविध कंपन्याचे अर्ज विचारात घेऊन पुरवठा साखळी / औषधी / अन्न इत्यादी तसेच Continuous Processing Units व अत्यावश्यक सेवा असल्याने जिल्हास्तरीय उद्योग समितीने घेतलेल्या निर्णयानुसार उपोद्घांतातील अ.क्र.६ मधील अधिसूचनेतील तरतुदीनुसार सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्टातील उद्योग व Continuous Processing कंपन्या ५०% कर्मचारी वर्गासह सुरु राहणार असुन, त्यांच्या आस्थापनावरील कर्मचारी / अधिकारी तसेच कच्चा माल व पक्कामाल वाहतूक करण्याकामी वाहनांना परवानगी देण्यात येत आहे.

(अनिल पारस्कर)
**जिल्हा पोलिस अधिक्षक**
**रायगड**

( निधी चौधरी )
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी रायगड-अलिबाग RAIGAD-ALIBAG

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई
प्रत :- पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग
प्रत :- पोलीस उपायुक्त, झोन-२, पनवेल

# Annexure - List of Factories & Warehouses

| Sl. | Name of Factory | Location |
|---|---|---|
| 308 | Balmer lawrie & Co. Ltd | Patalganga MIDC |
| 309 | Bhavna Laboratories Pvt Ltd | Taloja MIDC |
| 310 | Chemtron Science Laboratories Pvt. Ltd. | Khalapur |
| 311 | Cisco Systems | panvel |
| 312 | Du flon | mahad midc |
| 313 | Excelus FoodBev Pvt. Ltd | Khalapur |
| 314 | Flax Laboratories | Mahad Midci |
| 315 | Hindalco industries Ltd. | Taloja MIDC |
| 316 | Huawei Telecommunication India Co. pvt.ltd | panvel |
| 317 | Iron Mountain India Pvt. Ltd. | Khalapur |
| 318 | Jamuna Plast Private Ltd | Khalapur |
| 319 | Kamani Foods Private Ltd. | Khalapur |
| 320 | Khetan packfine Pvt.Ltd | khalapur |
| 321 | Khetan wellpack pvt Ltd | Khalapur |
| 322 | Licious (Delightful Gourment (P) Ltd.) | Taloja |
| 323 | M/s Glenmark Research Centre | Taloja MIDC |
| 324 | M/s Health Secure (I) Private Ltd | Taloja MIDC |
| 325 | Micro Go | Taloja MIDC |
| 326 | Oricon Enterprises Ltd. | Khalapur |
| 327 | Oricon Enterprises Ltd. | Khalapur |
| 328 | Rakyan Beverages Private Ltd | Panvel |
| 329 | Sanika Chemicals Pvt. Ltd | Midc mahad |
| 330 | Shree Dhootapapeshwar Ltd, | Panvel |
| 331 | Supreme Industries Ltd | Khalapur |
| 332 | Tejal Chemicals | Taloja MIDC |
| 333 | Universal Speciality Chemicals (p) Ltd | Taloja MIDC, Patalganga |
| 334 | Upl Ltd. | panvel |
| 335 | Venus Safety & Health Private Ltd | Taloja MIDC |
| 336 | ZTE Corporation | Panvel |

(Anil Paraskar)
Superintendent of Police
Raigad

DISTRICT MAGISTRATE
जिल्हा दण्डाधिकारी
रायगड-अलिबाग
RAIGAD-ALIBAG

(Nidhi Choudhari)
Collector Raigad